.. Anata Aratii ..

॥ अनंताची आरती ॥

जय श्रीअनंता लक्ष्मीकांता आरती ओवाळू ।
भक्तां संकट पडतां धावे अनंत कनवाळू ॥ धृ ॥

भाद्रपदमासी शुक्ल चतुर्दशी तव व्रत नेमाने ।
दुकूलदोरक करुनि पूजिति अनंत नामानें ॥ १ ॥

नानापरिची पुष्पें द्रव्ये तुजला अर्पीती ।
षोडशपूजा करूनी द्वाह्मण संतर्पण करिती ॥ २ ॥

अपूप वायान दंपतिपूजन त्या दिवशी करिती ।
अनंत सन्तुष्टोनि देती संतति संपत्ती ॥ ३ ॥

रामा धर्मे आचरीतां व्रत क्लेशांतुनि सुटला ।
कौंडिण्याने पुजितां तुजला उद्धरिले त्याला ॥ ४ ॥

मोरेश्वरसुत वासुदेव हा तिष्ठत सेवेसी ।
संकटकाळी रक्षी अनंता आपुल्या दासासी ॥ ५ ॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 26, 1999